पुढारी

# 'फिनोलेक्स' व 'मुकुल माधव'ला 'बेस्ट सीएसआर इंटिग्रेटेड बिझनेस' पुरस्कार

**पुणे :** फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. (एफआयएल) या पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग्समधील भारतातील आघाडीच्या उत्पादक कंपनीला आणि त्यांचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) यांना, त्यांच्या सीएसआर आणि सस्टेनेबिलिटी क्षेत्रात अप्रतिम कार्यासाठी नॅशनल सीएसआर लीडरशिप काँग्रेस अ‍ॅण्ड अवॉर्ड्सतर्फे संस्थात्मक विभागात 'बेस्ट सीएसआर इंडिग्रेटेड बिझनेस' हा राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला. बेंगळुरू येथे हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यांचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाऊंडेशनच्या सोबतीने या समाजविकास कार्याला आपल्या दैनंदिन कामकाजाचा भाग बनवून या क्षेत्रात केलेल्या अद्वितीय कामगिरीसाठी फिनोलेक्स इंडस्ट्रीज ओळखली जाते.

एफआयएल आणि एमएमएफमध्ये आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक उन्नतीच्या माध्यमातून वंचित समाजगटाच्या एकात्मिक




विकासावर भर दिला जातो. या संपूर्ण काळात त्यांची भक्कम दूरदृष्टी आणि या कामातील त्यांची झोकून देण्याची वृत्ती यामुळे हजारो कुटुंबांमध्ये आज एक चिरकालीन हास्य निर्माण झाले आहे आणि त्यांनी आपल्या कामातून 'देण्याची' संस्कृती जपली आहे. याच बांधिलकीमुळे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण सहभागासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. या प्रसंगी मुकुल माधव फाऊंडेशनच्या मॅनेजिंग ट्रस्टी रितू छाब्रिया म्हणाल्या, 'नॅशनल सीएसआर लीडरशिप काँग्रेस अ‍ॅण्ड अवॉर्ड्सतर्फे हा मानाचा पुरस्कार मिळाल्याने आम्हाला फारच आनंद झाला आहे.